**विषय :** महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम ९६ मधील तरतूदीनुसार ***"मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अधिकाराचे प्रत्यायोजन".***

## ***नाशिक जिल्हा परिषद, नाशिक***

"सामान्य प्रशासन विभाग"

जावक क्रमांक : साप्रवि/आस्था-६/ ३१० /२०१७.

नाशिक, दिनांक : २१ /०६/२०१७.

**वाचा :** ०१. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ चे कलम ९६ (१).
०२. मा.आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील पत्र क्र.विकास/इडीबी/१/१७४/९५, दि.१८ फेब्रुवारी, १९९५.

## -: आ दे श :-

**०१.** महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मधील कलम, ९१(२) अन्वये जिल्हा परिषद मुख्यालय व पंचायत समिती अंतर्गत कार्यरत असलेले गट-अ व गट-ब राजपत्रित अधिकाऱ्यांची दोन महिन्यांवरील, परंतू चार महिन्यांपर्यंत रजा मंजूरीचे अधिकार स्थायी समितीच्या सभापतींना आहेत.

**०२.** महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मधील कलम, १०९ (३) (ड) अन्वये जिल्हा परिषद मुख्यालय व पंचायत समिती अंतर्गत कार्यरत असलेले गट-अ व गट-ब राजपत्रित अधिकाऱ्यांची पूर्वगामी तरतुदी व्यतिरिक्त चार महिन्यांपर्यंत रजा मंजूरीचे अधिकार आहेत.

कलम १०९(३)(ड) मधील तरतूद वाचतांना कलम १०९(३)(अ) काळजीपूर्वक वाचणे आवश्यक ठरते. त्यामध्ये "पूर्वगामी तरतुदीत विनिर्दिष्ट केलेल्या अधिकाराव्यतिरिक्त" असा शब्दप्रयोग करण्यांत आलेला आहे. त्यामुळे रजेसंबंधातील व तरतुदीपुरता विचार केल्यास कलम ९५(२)(अ)(तीन) तसेच कलम ९१(२) मधील तरतुदीव्यतिरिक्त कलम १०९(अ)(ड) अन्वये स्थायी समितीस आणखी चार महिन्यांपर्यंत रजा मंजूर करता येते अशी तरतूद आहे.

**०३.** मा.सभापती, स्थायी समिती किंवा मा. स्थायी समिती यांना असलेल्या अधिकाराचे अनुषंगाने गट-अ व गट-ब अधिकाऱ्यांच्या रजेस मान्यता प्रदान करतात, तद्नंतर सदरच्या रजा मंजुरीच्या आदेशाचे प्रारुप आस्थापना विभाग प्रमुख यांचेकडून माझे स्वाक्षरीस्तव सादर केली जातात.

**०४.** सदरच्या कार्यपध्दतीत गतीमानता, सुसूत्रता येण्याच्या दृष्टीने मा.सभापती, स्थायी समिती किंवा मा.स्थायी समिती यांना असलेल्या अधिकाराचे अनुषंगाने गट-अ व गट-ब अधिकाऱ्यांच्या रजा प्रकरणांस मान्यता दिल्यानंतर, फक्त सदरच्या रजा मंजुरीच्या आदेशाचे प्रारुपावर स्वाक्षरी करण्यांचे अधिकार **"आस्थापना विभाग प्रमुख"** यांना या आदेशाव्दारे प्रदान करण्यांत येत आहे.

**०५.** प्रस्तुत आदेशान्वये प्रदान करण्यांत आलेल्या अधिकाराचा दुरुपयोग केल्यास, व त्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास, संबंधीत अधिकाऱ्यांवर शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यांत येईल, याची याव्दारे नोंद घ्यावी.

प्रदान करणेत आलेल्या अधिकारामध्ये कोणत्याही वेळी, कोणत्याही कारणास्तव बदल करणेची किंवा काढुन घेण्याचे अधिकार राखुन ठेवण्यांत येत आहे.

प्रस्तुत आदेश **"स्थायी आदेश"** संचिकेत सामील करावा.

प्रस्तुत आदेशाची अंमलबजावणी, आदेशाच्या दिनांकापासुन करण्यांत यावी.

CHIEF EXECUTIVE OFFICER ZILLA PARISHAD, NASHIK

21/06

**(दीपक कुमार मीना)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, नाशिक**

**प्रत : माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.**

०१. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक.
०२. खाते प्रमुख (सर्व), ......................., जिल्हा परिषद, नाशिक.
०३. गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व) ........................
०४. सहाय्यक गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व) ........................
०५. गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती (सर्व) ........................
०६. उप अभियंता (ल.पा./इवद/ग्रापापु), जि.प.उपविभाग (सर्व) ........................
०७. वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र (सर्व) ........................
०८. बाल विकास प्रकल्प अधिकारी, ए.बा.वि.यो.(सर्व) ........................

**प्रत : कार्यालयीन प्रत / ज्ञापन नस्ती.**